# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक** 9/2024

**विषय : राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या १०२१ महसुली मंडळांपैकी विभाजन झालेल्या नवीन महसुल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागू करण्याबाबत.**

**संदर्भ :** क्र.उशिसं-परीक्षा शुल्क-२०२३-२४, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ रोजीचे पत्र.

मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे उपरोक्त संदर्भिय पत्र सोबत जोडले असून सदर पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये दुष्काळसदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे. त्यानुसार संबंधित दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना सूचना देण्याबाबत कळविले आहे.

सबब, उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रामध्ये याबाबत स्वयंस्पष्ट सूचना दिलेल्या असून त्यानुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी आणि कोणत्याही परिस्थितीत दुष्काळसदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सोबत : पत्र क्र.उशिसं-परीक्षा शुल्क-२०२३-२४, दि. २३ फेब्रुवारी, २०२४ ची प्रत.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. परीक्षा/छावता/344 )
दिनांक : ०५/०३/२०२४ 06 )

**(डॉ.महेश काकडे)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
२. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
३. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
४. मा.संचालक, सर्व प्रशाला

/2024

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001
web : www.dhepune.gov.in
E-mail- schol.dhepune@gov.in
फोन नं -020/29707098/26126939
फॅक्स 020/26111153

क्र.उशिंस - परीक्षा शुल्क- 2023-24/ दिनांक -

प्रति,

1. सर्व विभागीय सहसंचालक,
   उच्च शिक्षण विभाग.
2. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

**विषय- राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या 40 तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या 1021 महसुली मंडळांपैकी विभाजन झालेल्या नवीन महसुल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करून सवलती लागू करण्याबाबत..**

संदर्भ- 1. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - 1592/1202/(1132)/साशि-5, दि. 11.10.1993
2. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. -एससीवाय-2023/प्र.क्र. 37/म-7 ,दि. 10.11.2023.
3. शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-2023/प्र.क्र.37/म-7, दिनांक- 16.02.2024.

उपरोक्त संदर्भ क्रमांक 1 येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक 3 नुसार, राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या 40 तालुक्यांव्यतीरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसूली मंडळांमध्ये जून ते सप्टेंबर 2023 या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या 75% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान 750 मि.मि पेक्षा कमी झाले आहे अशा वर नमूद दि. 10 नोव्हेंबर, 2023 च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे नमूद केलेल्या एकूण 1021 महसूली मंडळांपैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप प्रस्तावामधील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली 224 नवीन महसूल मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसुली मंडळाकरिता खालील सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या अभिनस्त संबंधीत दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

1.संदर्भ क्रमांक 1 येथील 18 ऑक्टोंबर, 1993 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 8 मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

2. सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी

3. तसेच विद्यापीठांने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

4. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर

526/2024

केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

5. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

Signed by Prakash Dhondu Bachhav
Date: 23-02-2024 15:00:49
Reason: Approved

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -1

प्रत,-मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -32